Literacy for a Billion

Movie: Vajwa re vajwa
Year: 1993

Song: Hee yuga yuganchi naati
Lyricist:

हो ...ओ...
ही युगा युगांची नाती
हळव्या प्रेमाची महती
ही युगा युगांची नाती
हळव्या प्रेमाची महती
सागरही थांबे केव्हा
त्या एका थेंबासाठी
ला...ला...ला...

अधीऱ्या लहरी
तालावरी नाचती
अधीऱ्या लहरी
तालावरी नाचती
मेघांच्याही मनी कसे
सात रंग हासती
आ...
वारा हळवा
झुळूझुळू वाहतो
मोहरून पाण्यामध्ये
प्रतिबिंब पाहतो
लाटा सागराला
लाटा सागराला
साद देती
ही युगा युगांची नाती
हो...
ही युगा युगांची नाती
हळव्या प्रेमाची महती
सागरही थांबे तेव्हा
त्या एका थेंबासाठी

आ...
रूपेरी वाळू वरी
सोनियाचा बंगला
रूपेरी वाळू वरी
सोनियाचा बंगला
बांधताना प्रीतीमध्ये
जीव माझा गुंतला
सागरी तळाशी
एक वेडा शिंपला
घरकुल मोतियांनी
सजवाया थांबला
दे ना प्रेमधारा
दे ना प्रेमधारा
तूच स्वाती
ही युगायुगांची नाती
हो...
ही युगायुगांची नाती
हळव्या प्रेमाची महती
सागरही थांबे तेव्हा
त्या एका थेंबासाठी

एवढंसं काय
एवढंसं काय
वांग
त्याला काय
देठ
तुमची आमची
कायमची भेट
आ...

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*

PlanetRead

Literacy for a Billion

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*